## निशाणी क्र. १२५ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करून वारस दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, या कामातील प्रतिवादी क्र. २ प्रकाश सहदेव परब हे दि.०६/०६/२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. २ चे मृत्यूला ९० दिवस उलटून गेल्याने तांत्रिक दृष्ट्या प्रतिवादीचे वारस दाखल करणेस विलंब झाला आहे. वादीचा दावा पुढे चालविणेचे दृष्टीने प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर झालेला विलंब माफ करुन प्रस्तूत प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जात संयुक्तिक कारण दिलेले नाही तरी सदर अर्ज नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित सदर अर्ज मंजूर करावयाचा झालेस वादीस जास्तीत जास्त रक्कम भरणेचा आदेश करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ अन्वये दाव्यातील वादी प्रतिवादी मयत झाल्यास त्यांचे वारसांना दाव्यात समाविष्ठ करुन घेण्याची तरतूद आहे. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटप व पृथक कब्जाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदर विलंब माफ करणे न्यायोचित वाटते. परंतू सदर झालेल्या विलंबाबाबत वादीने रक्कम भरणेचा आदेश पारीत करणे उचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा वादीचा अर्ज रक्कम रु. १००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

स्थळ : देवगड
दिनांक: ०३/०१/२०२२

( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.01.04 10:48:30 +0530